महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई
समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३ ,चर्च पथ, पुणे-४११००१

सकआ/आस्था/प्र-२/पदभरती/जाहिरात-घोषणापत्र/२०२४/ ५०१३ दिनांक १८.१०.२०२४. 21/10/2024

## घोषणापत्र

१. समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या आस्थापनेवरील वर्ग -३ संवर्गातील विविध पदभरती करीता दि.१०.१०.२०२४ रोजी सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीतील मुद्दा क्र.२१ मध्ये उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखक या पदांकरीता सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का-१३-अ,दि.०४ मे,२०२२ नुसार निवडीबाबत खालील प्रमाणे नमुद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

"ज्या पदांसाठी व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक असेल, अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ३० गुण ठेवून एकूण १२० गुणांची (एकूण ६० प्रश्न) परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. तथापि, जे उमेदवार परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील, अशा उमेदवारांनाच व्यावसायिक चाचणी देता येईल. परीक्षा व व्यावसायिक चाचणी यांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल".

२. सदर जाहिरातीत नमूद गृहपाल (महिला), गृहपाल (सर्वसाधारण) व समाज कल्याण निरीक्षक या संवर्गातील सरळसेवेची सामाजिक व समांतर आरक्षण रिक्त पदे दर्शविण्यात आलेली आहे. खालील प्रमाणे दिव्यांगासाठी निश्चित पदे खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | दिनांक १०.१०.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीत नमूद दिव्यांगासाठी खालील प्रमाणे निश्चित करावयाची पदे. |
|---|---|---|
| १ | गृहपाल (महिला) | ४ पदे - (१ पद-LV (अल्पदृष्टी), १ पद- D, HH (कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता), १ पद- BA, OA,OL,OAL, BL,BLA, BLOA, OAL, LC, DW, AAV), व १ पद - SLD, MI (विशिष्ट शिक्षण अक्षमता / मानसिक आजार) |
| २ | गृहपाल (सर्वसाधारण) | २ पदे- १ पद-MD (बहुविकलांगता) involving (a) to (d), व १ पद - LV (अल्पदृष्टी) |
| ३ | समाज कल्याण निरीक्षक | २ पदे - १ पद- D,HH (कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता), १ पद- BA, OA,OL,OAL, BL,BLA, BLOA, OAL, LC, DW, AAV), |

३. उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ / मदतीकरीता भ्रमणध्वनी क्र. ९९८६६३८९०१.

४. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ २०२२ /प्र.क्र.१२२ / का ०३ दिनांक ६ एप्रिल २०२३ नुसार सदर जाहिरातीत नमूद गृहपाल (महिला) व गृहपाल (सर्वसाधारण) या पदांकरीता अनुक्रमे १ (एक) पद संस्थात्मक व १ (एक) पद संस्थाबाहय उमेदवारांकरीता उपलब्ध होईल.

21.10.24

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त,समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य,पुणे.